### सोलापूर जिल्हा बँकेच्या नियमांमुळे

# हजारो शेतकरी पीक कर्जमाफीपासून वंचित

- २४ हजार शेतकरी थकबाकीदार
- ३६२ कोटींची थकबाकी
- ९० हजार+ नियमित कर्जदार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ मार्च-**

शेतकरी पीककर्जाची नियमित परतफेड करत असले तरी इतर कर्ज थकीत राहते. त्यामुळे बँकेच्या नोंदीमध्ये त्या शेतकऱ्यांना नियमित कर्जदार म्हणून गणले जात नाही. सरकारकडून जाहीर होणारी कर्जमाफी योजना मुख्यत्वे पीककर्जापुरती मर्यादित असते. त्यामुळे पीककर्ज नियमित असतानाही इतर कर्ज थकीत असल्यास अशा शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळू शकत नाही, असे बँक अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

या परिस्थितीमुळे हजारो शेतकरी कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे या निकषांमध्ये बदल करण्याची मागणी शेतकरी संघटनांकडून केली जात आहे. दरम्यान, जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या कर्जदारांची स्थिती चिंताजनक असल्याचे आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे.

बँकेकडे सध्या सुमारे २४ हजार शेतकरी थकबाकीदार असून त्यांच्याकडील एकूण थकबाकी ३६२ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. दुसरीकडे ९० हजार २०० शेतकरी नियमित कर्जदार म्हणून नोंद आहेत.

शेतकऱ्यांना तीन लाख रुपयांपर्यंतचे पीककर्ज बिनव्याजी दिले जाते. या कर्जावरील व्याजाची रक्कम केंद्र व राज्य सरकारकडून बँकांना दिली जाते. त्यामुळे अनेक शेतकरी दरवर्षी पीककर्ज घेतात आणि त्याची परतफेडही करतात. शेतकऱ्यांना आर्थिक अडचणी आल्यास बँका जुन्या कर्जाचे पुनर्गठन करुन त्यांना पुन्हा कर्ज देण्याची सुविधाही देतात. मात्र अनेक शेतकऱ्यांकडे पीक कर्जाबरोबरच दीर्घ मुदतीचे आणि मध्यम मुदतीचे कर्ज देखील आहे.

# मध्यपूर्वेतील तणावाचा फटका; गॅसचे दर भडकले

- इराण-इस्त्राईल-अमेरिका संघर्षाचे परिणाम
- पुरवठा विस्कळीत झाल्याने नागरिकांची धावपळ
- व्यावसायिक गॅस पुरवठा बंद, सर्वसामान्यांचे बजेट कोलमडले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ मार्च-**

मध्यपूर्वेत वाढलेल्या इराण-इस्त्राईल-अमेरिका तणावाचे पडसाद आता सोलापूरच्या स्थानिक बाजारात उमटू लागले आहेत. आंतरराष्ट्रीय घडामोडींमुळे गॅसच्या पुरवठ्यावर परिणाम झाला असून व्यवसायिक गॅस सिलेंडर पुरवठा बंद झाला आहे तर घरगुती गॅस सिलिंडरचे दर वाढल्याने सोलापूर शहरातील नागरिकांची तारांबळ उडाली आहे.

गॅस सिलेंडर घेण्यासाठी सोलापूरकरांनी शहरातील विविध गॅस वितरक कार्यालयासमोर रांगा लावलेल्या दिसून आल्या. तर काही नागरिकांना ऑनलाइन गॅस बुकिंग करताना अनेक अडचणी जाणवल्या. गॅस उपलब्ध नसल्याने सोलापूरकरांची शनिवारची सकाळ अत्यंत क्लेशदायक ठरलेली दिसत आहे.




दरम्यान, पुरवठा साखळीवर परिणाम झाल्यामुळे शहरात गॅसचा पुरवठा काही प्रमाणात विस्कळीत झाला आहे. परिणामी काही ठिकाणी गॅस मिळण्यात अडचणी निर्माण होत असून वाढलेल्या दरामुळे नागरिकांना आर्थिक फटका बसत आहे. मध्यपूर्वेतील परिस्थितीमुळे इंधन बाजारात चढ-उतार सुरु असल्याचे सांगण्यात येते. इराण-इस्त्राईल-अमेरिका संघर्षाचा परिणाम गॅस पुरवठ्यावर होत असून दरात वाढ झाल्याचे दिसत आहे. अचानक वाढलेल्या दरांमुळे आणि पुरवठ्यातील अनिश्चिततेमुळे सोलापूरकरांमध्ये चिंता व्यक्त केली जात असून परिस्थिती लवकर सुरळीत व्हावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

**घरगुती गॅस सिलिंडर दरात वाढ**

पूर्वीचा दर : ८६०.५० प्रति सिलिंडर
सध्याचा दर : ९१०.५० प्रति सिलिंडर
दरवाढ : ५० रुपये

**दरवाढीमागील कारणे**

मध्यपूर्वेतील इराण-इस्त्राईल-अमेरिका तणाव
आंतरराष्ट्रीय बाजारातील इंधन दरवाढ
गॅस पुरवठा साखळीवर परिणाम

**परिणाम**

- ✔ सोलापूर शहरात गॅस पुरवठा विस्कळीत
- ✔ ऑनलाइन गॅस बुकिंग करताना अडचणी
- ✔ काही भागात सिलिंडर मिळण्यास विलंब
- ✔ नागरिकांची धावपळ, आर्थिक ताण

## बनावट नोटा बाळगल्या; एकाविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ मार्च-**

भारतीय चलनाच्या बनावट नोटा दैनंदिनी व्यवहारांमध्ये लोकांना देऊन त्या खरे असल्याचे भासवून १ लाख १० हजार ५०० रुपयांच्या ५०० च्या बनावट नोटा बाळगल्याबाबत दोघांवर जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. दि.६ मार्च रोजी राजू विश्वनाथ चोरमुले (रा.पोबार्डी) याने स्वतःचा फायदा करुन घेण्याच्या उद्देशाने १ लाख १० हजार ५०० रुपयांच्या ५०० रुपयांच्या बनावट नोटा बाळगल्या. या नोटा अतुल भारत तावरे (रा.करकंब) यांच्याकडून घेतले असल्याचे त्याने कबुली दिली. पुढील तपास पाटील हे करत आहेत.



## जबरी चोरीसह पाच घरफोडी चोरीचे गुन्हे उघडकीस

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, ७ मार्च-**

जबरी चोरीसह सहा गुन्हयातील पाहिजे असलेल्या आरोपीकडून पाच घरफोडी चोरीचे गुन्हे उघडकीस आले. आरोपीकडून २८ ग्रॅम वजनाचे सोने, ९७ किलो तांब्याचे तार एकूण ५ लाख १७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अकलूज पोलिस ठाणे हद्दीतील श्रीपुर या गावातील पाटील वस्ती येथे दि.२२ ऑक्टोंबर २०२५ रोजी अज्ञात चोरट्याने दोन घरामध्ये घरफोडी चोरी करून सोने चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरुन नेले होते. शुभम परशुराम भोसले याने आशिष शितल काळे रा. उगलेवाडी ता.कराड जि. सातारा, रोहित सचिन काळे रा.



बारामती जि. पुणे याचे सोबत मिळून घरफोडी केल्याची कबुली दिली. पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलिस अधीक्षक प्रितम यावलकर, वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि विजय गोसावी, भिमगोंडा पाटील, पोउनि कुलदीप सोनटक्के, पोह सलीम बागवान, हरिदास पांढरे, विरेश कलशेट्टी, पोकॉ बाळराजे घाडगे, अन्वर अत्तार, राहुल दोरकर, हरीष थोरात, चापोकॉ सुनिल पवार, अशोक हलसंगी, मपोह दीपाली जाधव, अश्विनी गोटे यांनी ही कामगिरी बजावली.

## 'इको फ्रेंडली क्लब'
# इको फ्रेंडली रंगांचा जागर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ मार्च-**

रंगपंचमी म्हटलं की डोळ्यासमोर येतात ते पाण्याचे फवारे आणि रासायनिक रंगांची उधळण. पण, याच सणाला पर्यावरणपूरक वळण देण्यासाठी आणि मानवी आरोग्याला इजा पोहोचवणाऱ्या रंगांना फाटा देण्यासाठी सोलापुरात १२ वर्षांपूर्वी एक रोपटे लावले गेले, त्याचे नाव 'इको फ्रेंडली क्लब'. यंदा या क्लबच्या सामाजिक कार्याला १२ वर्षे पूर्ण होत असून, आपल्या पर्यावरणपूरक सेवेची 'तपपूर्ती' हा क्लब 'नैसर्गिक रंगांच्या' स्टॉलद्वारे साजरी करत आहे.




इको फ्रेंडली सण साजरा करा असे केवळ आवाहन करून बदल घडत नाही, तर त्यासाठी पर्याय उपलब्ध करून देणे आणि कृती करणे गरजेचे आहे, या विचारातून इको फ्रेंडली क्लबची स्थापना झाली. गेल्या १२ वर्षांपासून सोलापूरकरांना इको फ्रेंडली क्लबतर्फे पर्यावरणपूरक रंग उपलब्ध करून दिले जात आहेत. रासायनिक रंग आणि पाण्याचा अतिवापर टाळून 'कोरडी रंगपंचमी' साजरी व्हावी, हा यामागचा मुख्य उद्देश आहे. रंगपंचमीसह पर्यावरणपूरक गणेशोत्सव, पर्यावरणपूरक दिवाळी आणि इतरही सण-उत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरे व्हावे यासाठी इको फ्रेंडली क्लब प्रयत्नशील आहे.

आम्ही केवळ जनजागृती करून थांबलो नाही, तर सोलापूरकरांना नैसर्गिक रंग सहज उपलब्ध करून दिले. गेल्या १२ वर्षांपासून मिळणारा प्रतिसाद हा आमच्या पर्यावरण साधनेचाच एक भाग आहे. रंगपंचमीसह आपले सर्वच सण - उत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरे व्हावेत यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, असे माहिती सरस्वती नारायणकर-कोकणे यांनी दिली.



## हिंदूराष्ट्र जागृती सभेच्या पार्श्वभूमीवर साजरी होते जणू दिवाळीच

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ मार्च-**

हिंदुराष्ट्र जागृती सभेच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहरात उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले असून अनेक ठिकाणी जणू दिवाळी साजरी होत असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

बुधवार, ११ मार्च रोजी सायंकाळी ५.३० वाजता जय भवानी प्रशालेच्या मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या हिंदुराष्ट्र जागृती सभेच्या प्रसिद्धी आणि प्रसारासाठी हिंदू जनजागृती समितीतर्फे संपूर्ण सोलापूर शहर तसेच ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात आली आहे. या सभेच्या निमित्ताने सोलापुरात दोन ठिकाणी भव्य प्रसार फेरीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसार फेरीमध्ये शेकडो हिंदुत्वनिष्ठ, धर्माभिमानी आणि धर्मप्रेमी नागरिक उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.

प्रसार फेरी ज्या ज्या भागातून मार्गक्रमण करत होती, त्या त्या भागातील धर्मप्रेमींनी अत्यंत उत्साहाने फेरीचे स्वागत केले. अनेक ठिकाणी फेरीतील धर्मध्वजाची विधिवत पूजा करण्यात आली. तसेच नागरिकांनी आपल्या घरासमोर सुंदर रांगोळ्या काढून दिवे लावले होते.

# ४० दिवसांत १५ हजार ट्रक कांद्याची विक्री


### शेतकऱ्यांच्या पदरी अवघे ११८ कोटी

**सोलापूर बाजार समितीत कांद्याला ७ ते १० रुपये किलो दर; उत्पादन खर्चही निघेना**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ मार्च-**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत मागील ४० दिवसांपासून कांद्याचे दर मोठ्या प्रमाणात घसरले असून शेतकऱ्यांना अत्यल्प भाव मिळत आहे.

जानेवारी ते मार्च महिन्याच्या कालावधीत बाजार समितीत तब्बल १४ हजार ९२८ ट्रक (सुमारे १४ लाख ९३ हजार ९६७ क्विंटल) कांदा विक्रीसाठी आला, मात्र त्यातून शेतकऱ्यांना अवघे ११८.५४ कोटी रुपये मिळाले आहेत. सध्या बाजारात कांद्याला प्रतिकिलो सरासरी ७ ते ९ रुपये दर मिळत आहे.



काही मोजक्या दर्जेदार कांद्याला १५ ते १८ ते २० रुपये प्रतिकिलो दर मिळत असला तरी बहुतांश कांदा ६५० ते ७५० रुपये प्रतिक्विंटल या दरानेच विकला जात आहे. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे.

सोलापूर बाजार समितीत पुणे, बीड, अहिल्यानगर, धाराशिव तसेच सोलापूर जिल्ह्यातील माढा, मोहोळ, करमाळा, बार्शी या तालुक्यांतून मोठ्या प्रमाणावर कांद्याची आवक होत आहे. मागील ४० दिवसांत केवळ सहा दिवसच आवक ४०० ट्रकांपेक्षा कमी राहिली. अन्यथा उर्वरित ३४ दिवस दररोज ४५० ते ५५० ट्रक कांदा विक्रीसाठी आल्याची नोंद आहे. आवक मोठ्या प्रमाणात असतानाही दरात कोणतीही लक्षणीय सुधारणा झालेली नाही.

यंदाच्या कांदा हंगामाच्या सुरुवातीला शेतकऱ्यांना तुलनेने चांगले दर मिळाले होते. ऑक्टोबर २०२५ मध्ये कांद्याला ९५० ते १००० रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला. त्यानंतर नोव्हेंबरमध्ये ८०० ते १२०० रुपये, तर डिसेंबरमध्ये ८५० ते १७०० रुपये दर मिळाला. नववर्षाच्या सुरुवातीला भाव वाढतील, अशी शेतकऱ्यांची अपेक्षा होती. जानेवारी महिन्यात ८०० ते २४०० रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला होता. मात्र त्यानंतर दरात मोठी घसरण झाली. फेब्रुवारीमध्ये ७०० ते ९०० रुपये, तर मार्च महिन्यात ६५० ते ७५० रुपये प्रतिक्विंटल असा दर मिळत आहे.

कांद्याची लागवड करण्यासाठी मशागत, रोपलागवड, खते, फवारणी, खुरपणी, काढणी तसेच चिरून बारदाण्यात भरून बाजारात नेईपर्यंत एकरी सुमारे ४० ते ४५ हजार रुपयांपर्यंत खर्च येतो. मात्र सध्याच्या दरामुळे हा खर्चही निघत नसल्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आले आहे. दरम्यान, अतिवृष्टी व महापुराच्या संकटातून सावरणाऱ्या शेतकऱ्यांना कांद्याच्या कमी दराचा मोठा फटका बसला आहे. त्यामुळे राज्य सरकारने कांद्याला प्रतिक्विंटल ५०० ते १००० रुपये अनुदान द्यावे, अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

## कमरेच्या पट्ट्याने महिलेला केली मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ मार्च-**



कारण नसताना दरवाजा जोरजोरात वाजवून शिवीगाळ करत, कमरेच्या पट्ट्याने मेव्हणीच्या मुलाने शिवशरण चलवादी यांच्या पत्नीला मारहाण केली. ही घटना दि. ५ मार्च रोजी घडली. याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

विश्वनाथ सुरेश गायकवाड (रा.संतोष नगर, बाळे, सोलापूर) यांच्या मेव्हणीचा मुलगा शिवशरण चलवादी (रा.संतोष नगर, बाळे, सोलापूर) हा घरी येऊन दरवाजा जोरजोरात वाजवून शिवीगाळ करत होता. तेव्हा, विश्वनाथ व त्यांची पत्नी बाहेर आली असता शिवशरणने कमरेच्या पट्ट्याने विश्वनाथ यांच्या पत्नी रुपाली यांना मारहाण करण्यास सुरुवात केली. विश्वनाथ यांनी सोडविण्याचा प्रयत्न केला असता दरवाजाजवळ पडलेला लोखंडी पाना उचलून त्यांच्या डोक्यात मारला व मानेवर चावा घेतला.

# प्रसारमाध्यमात महिलांची संख्या वाढतेय : उपमहापौर देवकर

**श्रमिक पत्रकार संघ, दयावान बहुउद्देशीय संस्थेतर्फे सन्मान**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ मार्च-**

प्रसार माध्यमात महिलांची संख्या वाढत आहे. त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. महिलांचे सक्षमीकरण ही काळाची गरज आहे. महिलांच्या अडीअडचणी, प्रश्न प्राधान्याने सोडविण्याचा आमचा प्रयत्न राहील, अशी ग्वाही उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांनी दिली.

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सोलापूर श्रमिक पत्रकार संघ आणि दयावान बहुउद्देशीय सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या प्रसार माध्यमात काम करणाऱ्या महिलांचा सन्मान सोहळ्यात त्या बोलत होत्या. व्यासपीठावर मोनिका देवेंद्र कोठे, धनश्री विनायक कोंड्याल, नगरसेविका विजया नागेश खरात, धनश्री विनोद भोसले, माजी नगरसेविका मंगला दिलीप कोल्हे, विक्रम खेलबुडे, खजिनदार किरण बनसोडे यांची उपस्थिती होती.



मोनिका देवेंद्र कोठे याप्रसंगी बोलताना म्हणाल्या, महिला आपल्या कुटुंबाची काळजी घेतात. प्रत्येक यशस्वी स्त्रीमागे पुरुष असतात. म्हणूनच महिला पुढे जात आहेत. स्त्री-पुरुष समान आहेत. एकमेकांचा आदर केला पाहिजे.

धनश्री विनायक कोंड्याल म्हणाल्या, महिला दिन हा केवळ एक दिवसाचा सन्मान सोहळा नाही तर वर्षभर महिलांचा सन्मान राखला पाहिजे. रोज हा उत्सव साजरा झाला पाहिजे. सर्व क्षेत्रातील महिलांचा मानसन्मान होत आहे. विजया खरात, धनश्री भोसले, मंगला कोल्हे यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी साक्षी सुराणा, गंगा कदम, तेजस्विनी पाटील, माऊली अडकुर, श्रावणी सूर्यवंशी, उमादेवी अभंगराव यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

किरण बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. श्वेता हुल्ले यांनी सूत्रसंचालन केले. उमेश कदम यांनी आभार मानले.

## दहावीनंतरच्या शैक्षणिक विकल्पांवर रोटरी क्लब स्मार्ट सिटीचे मार्गदर्शन

**सोलापूर :** रोटरी क्लब ऑफ सोलापूर स्मार्ट सिटीतर्फे सहारा नगर येथील आयडियल सेमी इंग्लिश व उर्दू माध्यम शाळेतील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी दहावीनंतर उपलब्ध असलेल्या विविध शैक्षणिक विकल्पांवर मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमात क्लबचे अध्यक्ष डॉ. अकबरसाहेब नदाफ यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या आवड, क्षमता व ध्येय लक्षात घेऊन योग्य शैक्षणिक शाखेची निवड करण्याबाबत मार्गदर्शन केले. या मार्गदर्शनाचा दीडशेहून अधिक विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. याप्रसंगी क्लबचे सदस्य रोटे. डॉ. शिवगंगा मैंदर्गी व रोटे. भारत कदम हे उपस्थित होते. मुख्याध्यापक जनवाडकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

प्रथम पुण्यस्मरण



स्मृतीशेष :
लक्ष्मणराव आप्पाराव गोतसुर्वे (माजी जिल्हा परिषद सदस्य)

वाटले नव्हते कोणालाही असे अघटीत घडून जाईल,
चालता बोलता तुम्ही आम्हास सोडून जाईल.. माणुसकी, स्नेह याची
ज्यावेळी चर्चा होईल, त्यावेळी आण्णा सर्वात पहिली आठवण तुमची येईल..!

आपल्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन

शोकाकुल

श्रीमती जनाबाई ल. गोतसुर्वे (पत्नी) । श्रीमती सुभाबाई ल. गोतसुर्वे (पत्नी)
मुले : भगवान, बलवान, चिंतन, जितेंद्र । मुली : मीनाक्षी, ऐश्वर्या (हौशा)
सुना : सौ.रमा, सौ.गौतमी, सौ.श्रीदेवी, सौ.शीतल
नातवंडे : प्रणाली, श्रेयांश, क्षितीजा, देविका, प्रणित, सौमित, कुंजल

समस्त गोतसुर्वे परिवार, आचेगांव, ता.दक्षिण सोलापूर

विधी कार्यक्रम : रविवार दि.०८/०३/२०२६ रोजी सायं.६ वाजता । स्थळ : स्वगृही आचेगांव

महत्वाचे...




## प्रा. राजेंद्र ठोंबरे लिखित 'विद्यामंदिरचे पुजारी' पुस्तकाचे प्रकाशन

**सांगोला,दि. ७ मार्च-**

सांगोल्यातील प्रा.राजेंद्र ठोंबरे यांच्या विद्यामंदिरचे पुजारी या पुस्तकाचे प्रकाशन प्राचार्य सयाजीराजे मोकाशी, डॉ.कृष्णा इंगोले, बाबुरावजी गायकवाड, प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, डॉ.अनिकेत देशमुख, डॉ. प्रभाकर माळी, प्रा. नीलिमा कुलकर्णी, सुवर्णा इंगवले, कल्याण शिंदे, इंद्रजीत घुले यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी मनोगतात डॉ.कृष्णा इंगोले यांनी लेखकाच्या दृष्टीने त्याच्या पुस्तकाचे प्रकाशन होणे म्हणजे अपत्य प्राप्तीचा आनंद मिळण्यासारखेच आहे तसेच प्राचार्य सयाजीराजे मोकाशी यांनी प्रा.राजेंद्र ठोंबरे यांचा शिक्षक, पत्रकार आणि लेखक ते आता साहित्यिक असा झालेला प्रवास खरोखरच कौतुकास्पद आहे असे प्रतिपादन केले. याप्रसंगी रुद्राणी ठोंबरे, माजी प्राचार्य महादेव झिरपे व भीमाशंकर पैलवान यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा.धनाजी चव्हाण व अनुराधा गुळमिरे यांनी केले. आभार प्राचार्य अमोल गायकवाड यांनी मानले.



## दुधनी जि.प. शाळेत महिला सक्षमीकरण सप्ताह

**अक्कलकोट, दि.७ मार्च-**

तालुक्यातील दुधनी येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी केंद्र शाळामध्ये महिला सक्षमीकरण सप्ताह व जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कर्तृत्ववान महिला अंबिका कोलाटी होत्या. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पुजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. सर्व माता पालक यांचे मुख्याध्यापक पोमू राठोड यांनी स्वागत केले. याप्रसंगी आरोग्य, पोषण व स्वच्छता मार्गदर्शन, मासिक पाळी जनजागृती विषयबाबत आरोग्य अधिकारी डॉ. सपना दिन्नी व स्टाफ नर्स ललिता बंदिचौडे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी विविध स्पर्धा घेण्यात आले. स्पर्धेला माता-पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रथम व द्वितीय क्रमांक आलेल्या मातांना गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे यांच्या हस्ते बक्षिसे देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी कावेरी झळकी, मलम्मा मोडलकर, विजयालक्ष्मी कामनळ्ळी, अंबिका कोटनूर, अफरा चौधरी, अंबिका गोटे, भूवनेश्वरी गळवे, धानम्मा रोडगे, गीता कोगनूर, ऐश्वर्या अल्लापूर, रेश्मा माशाळ, अंबिका सिन्नूर, रिजवान बडेखा, लक्ष्मी चिणमगेरी, सायरा शेख, जिलेखा चौधरी, अंबिका माशाळ अमिना मोमीन, नाझमीन गौर, पपिता बागडे, प्रिया गौर, यास्मिन शेखजी, प्रियंका गोटे, कावेरी केरूर, रंगूबाई बोनार, अमिना मोमीन, सुरेखा परमगोळ, कावेरी कोळी, रेणूका टेंगळे, कल्पना झळकी, ललित निंबाळ, कस्तुराबाई गंगावती, सैदप्पा झळकी, गणेश ओहोळ बसवराज शावरी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी जेष्ठ शिक्षिका शोभा म्हेत्रे, रविकुमार कोरचगाव यांचे सहकार्य लाभले तर सुत्रसंचालन उपक्रमशील शिक्षिका अंजली गुंजोटे यांनी केले तर संजीवकुमार बेण्णेसूर आभार मानले.

## महिला दिनानिमित्त करमाळ्यात विविध कार्यक्रम

**करमाळा, दि. ७ मार्च-**

करमाळा नगरपरिषद आणि अखिल भारतीय ग्राहक पंचायत (करमाळा) यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त सखी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार दि.९ ते बुधवार दि.११ पर्यंत (दुपारी १ ते ४ या वेळेत) असे तीन दिवस होणाऱ्या या मेळाव्यात महिलांसाठी विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जाणार आहेत. सोमवार दि.९ रोजी संगीत खुर्ची आणि बकेट मध्ये बॉल टाकणे अशा दोन स्पर्धा घेण्यात येणार आहेत. मंगळवारी पाककृती आणि उखाणे स्पर्धा होणार आहेत. बुधवारी सांस्कृतिक कार्यक्रम व बक्षिस वितरण समारंभाने या मेळाव्याची सांगता होणार आहे. वरील प्रत्येक स्पर्धेमधून प्रथम तीन विजेते निवडण्यात येतील व विजेत्यांना आकर्षक बक्षिस देण्यात येणार आहेत. सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये सहभाग घेणाऱ्या महीलांना आकर्षण भेटवस्तू देण्यात येणार आहेत. शहरातील एस टी स्टँड समोरील विकी मंगल कार्यालयात हे कार्यक्रम होणार असून मेळाव्यात महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करमाळा नगर परिषदेच्या नगराध्यक्षा मोहिनी सावंत, उपनगराध्यक्ष अतुल फंड, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती निर्मला गायकवाड आणि अखिल भारतीय ग्राहक पंचायत (करमाळा) यांच्या वतीने करण्यात आले आहे. या मेळाव्यातील स्पर्धांसाठी इच्छुक असलेल्या महिलांनी नाव नोंदणीसाठी तुषार टांकसाळे (मो.९९६०२३६५७१), अश्विनी जाधव (मो. ७९७२८४७२०९), शितल बहाड (मो.९१७२४२३३५१), सुप्रिया पालखे (मो.७९७२६५०५०८) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन मुख्याधिकारी सचिन तपसे यांनी केले आहे.

## अल्पवयीन मुलीस फुस लावून पळविले; अज्ञाताविरुध्द गुन्हा दाखल

**मंगळवेढा दि.७ मार्च -**




मंगळवेढ्याच्या ग्रामीण भागातून एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीस अज्ञात कारणावरुन फुस लावून पळवून नेण्याचा प्रकार घडला असून याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,दि.५ रोजी रात्री १२.३० ते सकाळी ६ च्या दरम्यान ही अल्पवयीन मुलगी असल्याचे माहित असूनही अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरुन राहते घरातून फुस लावून पळवून नेली असल्याची फिर्याद तिच्या कुटूंबियांनी दिल्यानंतर अज्ञात व्यक्ती विरुध्द पोलीसात गुन्हा दाखल झाला असून याचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक बनकर हे करीत आहेत.

# 'विठ्ठल'तर्फे सभासदांना स्वस्त दरात साखर

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ७ मार्च-**

श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या वतीने गुढीपाडवा सणानिमित्त सर्व सभासदांना व सन २०२५-२६ मध्ये ऊस पुरवठा केलेल्या सर्व ऊस पुरवठादार व कामगारांना २५ किलो पॅकींगमध्ये रुपये ३०/- प्रती किलो या दराप्रमाणे २५ किलो साखर प्रति सभासद, ऊसपुरवठादार व कामगार यांना वाटप करण्यात येणार असल्याचे चेअरमन तथा माढ्याचे आमदार अभिजित पाटील यांनी जाहीर केले.

दरम्यान पंढरपूर येथील साखर वाटप केंद्राचे उद्घाटन ज्येष्ठ संचालक दिनकर दाजी चव्हाण, संत मुक्ताबाई मठाचे व्यवस्थापक शशिकांत पाटील, वास्तुशिल्पचे मालक व निशीगंधा बँकेचे चेअरमन आर.बी. जाधव, सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता तथा संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष विश्वंभर काशिद, आनंदबापु पाटील, श्री स्वामी समर्थ हॉस्पिटल व गजानन मेडिकलचे मालक गजाननबापू बागल यांचे हस्ते करण्यात आले.

कारखाना साईटवरील साखर वाटप केंद्राचे उद्घाटन संचालक प्रविण कोळेकर व सिध्देश्वर बंडगर, वर्क्स मॅनेजर यु.के. तावरे, चिफ केमिस्ट बी. आर. माने, लिगल ऑफिसर ओ.जे.अवधुत, चिफ अकौंटंट ओ.एस. शिंदे, शुगर सेल अधिकारी महेश घाडगे, हेड टाईम किपर एस.एस. जगताप व इतर अधिकारी यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी सर्व सभासद, ऊसपुरवठादार, ठेकेदार, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सर्व सभासदांनी कुपनावर नमुद केलेल्या मुदतीमध्ये साखर घेऊन जावे असे आवाहन यावेळी संचालक मंडळाकडून करण्यात आले.

### या वेळेत मिळणार साखर

दरम्यान साखर वाटप केंद्र हे सकाळी ९.३० ते दुपारी १२.३० व दुपारी १.३० ते सायं. ५.३० या वेळेमध्ये चालू राहतील. तसेच सध्या कारखान्याचा ऑफ सिझन चालू असल्यामुळे दर शनिवार, रविवार या दिवशी सुट्टी असल्याने व इतर जाहीर केलेल्या सार्वजनिक सुट्ट्या दिवशीही साखर दुकान बंद राहील.

### ऊस पुरवठादार व कामगारांना गुढीपाडवा सणानिमित्त साखर विक्री सुरू



### या ठिकाणच्या केंद्रावर मिळणार साखर

बुधवार दि ४ ते ३१ मार्च पर्यंत कारखाना साईटवर विठ्ठल कॅन्टीन शेजारी व पंढरपूर शहरामध्ये समृध्दी ट्रॅक्टर शोरुम, कॉलेज रोड, पंढरपूर येथे वाटप चालू राहील. या बरोबरच मंगळवेढा, मोहोळ, माळशिरस व सांगोला येथील ऊस पुरवठादार यांनी पंढरपूर येथील साखर वाटप केंद्रातून साखर कुपनवर नमुद केलेल्या मुदतीमध्ये घेऊन जावी. तसेच माढा, करमाळा, बार्शी व परांडा गेटकेन ऊस पुरवठादार शेतकऱ्यांसाठी माढा विभाग : शेटफळ रोड, माढा, करमाळा व टेंभुर्णी विभाग : शिवसंकल्प गौरी प्लाझा, हॉटेल सुमित समोर, टेंभुर्णी, लऊळ विभाग : मौजे लऊळ गट ऑफिस, पंढरपूर-कुडूवाडी रोडवर, लऊळ येथे साखर वाटप केंद्र चालु केले असून सदर केंद्रातील साखर वाटप दि.५ ते १८ मार्च पर्यंत साखर चालु राहिल.

## धर्म तोडण्यासाठी नाही तर जोडण्यासाठी : माजी मंत्री म्हेत्रे

### वागदरीत इफ्तार पार्टीचे आयोजन



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.७ मार्च-**

धर्म हा जोडण्यासाठी असतो, तोडण्यासाठी नाही, हिंदू-मुस्लिम ऐक्याचा संदेश देत समाजात बंधुभाव आणि ऐक्य वाढावे, या उद्देशाने सरपंच शिवानंद घोळसगाव यांनी पुढाकार घेत इफ्तार पार्टीचे आयोजन केले असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री सिद्धराम म्हेत्रे यांनी केले.

वागदरी येथे सरपंच घोळसगाव यांनी इफ्तार पार्टीचे आयोजन केले होते. यावेळी मनोगत व्यक्त करताना माजी जिल्हा परिषद सदस्य आनंद तानवडे म्हणाले की, वागदरी हे गाव ऐक्याचे प्रतीक आहे. येथे सर्वधर्मीय लोक प्रेमाने आणि एकोप्याने राहतात. या इफ्तार पार्टीत नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी माजी पंचायत समिती सदस्य सायबू गायकवाड, माजी पंचायत समिती सदस्य गुंडप्पा पोमाजी, माजी जिल्हा परिषद सदस्य सुधीर सोनकवडे, माजी सरपंच परमेश्वर पोमाजी, सामाजिक कार्यकर्ते शरण सुरवसे, भुरीकवटेचे शाबुद्दीन शेख, नबीसाहेब नदाफ, सिद्धराम कोळी, ग्रामपंचायत सदस्य हनीफ मुल्ला ,बाबुराव जावळकोटी, महेश बंडगर, श्रीशैल ठोंबरे, विजयकुमार निंबाळे, प्रकाश पोमाजी, राम पोमाजी, सुरेश माने, परमेश्वर फुलमाळी यांच्यासह सर्वधर्मीय नागरिक, कार्यकर्ते आणि तरुण मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.




## अक्कलकोटच्या कार्यकर्त्यांनी केला आमदार पडळकरांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि. ७ मार्च -**

विधीमंडळ अधिवेशनानंतर आ.गोपीचंद पडवळकर यांच्या शिव मल्हार क्रांती सेनेच्या तालुक्यातील पाच गावात शाखा उघडण्यात येणार असल्याची माहिती शिव मल्हार क्रांती सेनेचे भुताळी वागदरी यांनी दिली.

भाजपा पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल आ.पडवळकर यांचा बोरी उमरगेचे श्रीशैल पाटील,मल्लिनाथ पाटील, सिद्धलिंग पाटील,गणपती पाटील, रवी बिराजदार, इराय्या स्वामी, बलभीम पाटील, गोरखनाथ पाटील आदींनी बेळंकी (ता. मिरज) येथे सत्कार केला.

यावेळी मिरजगीचे माजी सरपंच कल्लप्पा गवळी, सोमनाथ निंबाळ उपस्थित होते. यावेळी अक्कलकोट तालुक्यातील बोरी उमरगे, मिरजगी, मैंदर्गी, बिंजगेर, रुद्देवाडी येथे शिव मल्हार क्रांती सेनेच्या शाखा स्थापना करण्याबाबत तसेच अक्कलकोट तालुका पदाधिकारी व अध्यक्ष निवडी संदर्भात विचारविनिय करण्यात आला. सध्या अधिवेशन चालू असल्याने २५ मार्च नंतर शाखा स्थापना करण्याचे ठरले आहे. यावेळी विविध विकास कामाबाबत आ. पडवळकर यांना निवेदन देण्यात आले.



## खुडूसच्या महाराजस्व शिबिरात २५५ लाभार्थ्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि.७ मार्च-**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत महालिंगेश्वर विद्यालय खुडूस येथे आयोजित करण्यात आलेल्या शिबिरास नागरिकांनी उस्फुर्त प्रतिसाद देत २५५ लाभार्थ्यांनी लाभ घेतल्याची माहिती प्रांताधिकारी विजया पांगारकर यांनी दिली.

या कार्यक्रमाला उपविभागीय अधिकारी श्रीमती विजया पांगारकर मॅडम, प्रभारी तहसीलदार श्री अमोल कदम, महसूल नायब तहसीलदार सिद्धनाथ जावीर साहेब, धानोरे सरपंच जीवन जानकर ,पंचायत समितीचे माजी सभापती मच्छिंद्र ठवरे, श्रीराम शिक्षण संस्था पानीवचे सचिव करण पाटील, खडूस मंडळाधिकारी सिद्धेश्वर भोसले ,खडूस तलाठी सचिन पाटील, खडूस मंडलातील सर्व तलाठी कोतवाल सर्व महा-ई-सेवा चालक हजर होते.

या शिबिरात जातीचे दाखले ४९, डोमासाईल प्रमाणपत्र १७, उत्पन्न दाखला १२, सामाजिक अर्थसहाय्य योजना २८, तुकडे जोड तुकडे बंदी कायद्यान्वये लाभार्थी १९, कजाप लाभार्थी ६०, रेशन कार्ड लाभार्थी ११, कृषी विभाग लाभार्थी दोन ट्रॅक्टर वाटप, भूमी अभिलेख विभाग लाभार्थी ५, वारस नोंदी जिवंत सातबारा १६, आरोग्य विभाग आरोग्य तपासणी ३६ लाभार्थी . असे एकूण २५५ लोकांनी या शिबिरामध्ये लाभ घेतला.

## सोलापूर विद्यापीठाच्या सृजनरंग स्पर्धेत सांगोला महाविद्यालयाचे यश

**सांगोला, दि. ७ मार्च -**

सोलापूर विद्यापीठ आयोजित सृजनरंग वार्षिक नियतकालिका स्पर्धेत सांगोला महाविद्यालयाने उल्लेखनीय यश मिळवले. महाविद्यालयाने माणदेश नियतकालिका स्पर्धेसाठी सादर केली होती. यासाठी संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, उपाध्यक्ष तात्यासाहेब केदार, प्रा.प्रबुध्दचंद्र झपके, खजिनदार नागेश गुळमिरे, सचिव ॲड. उदयबापू घोंगडे, सहसचिव साहेबराव ढेकळे, प्राचार्य डॉ.सुरेश भोसले यांचे मार्गदर्शन लाभले. माणदेश या वार्षिक नियतकालिकाचे कामकाज संपादक प्रा.डॉ.अमोल पवार, सहसंपादक प्रा.डॉ.बी. एस. गायकवाड, प्रा.डॉ.व्ही. एस.कांबळे, प्रा.डॉ.एम.ए.जगताप, प्रा.डॉ.आर.जी.खानापुरे, प्रा.डॉ. जे.एम.तांबोळी, प्रा.एन. जी.पाटील, प्रा.पी.व्ही.काटे, प्रा.व्ही.व्ही. कुलकर्णी, प्रा.पी. एन.लामगुंडे, प्रा.टी.के.मिसाळ यांनी पाहिले.

### स्पर्धेतील पारितोषिक विजेते विद्यार्थी

**स्नेहल काशीद- मराठी विभाग- वैचारिक लेखन**
**साक्षी बाबर- हिंदी विभाग- नाट्यात्मक लेखन**
**नूर बागवान- हिंदी विभाग- ललित गद्य लेखन**
**पौर्णिमा नापिक- कन्नड विभाग- वैचारिक लेखन**





# कासेगावात भाकरी-आमटीच्या प्रसादाने भाविक तृप्त

## श्रीसंत तुकाराम बीजेनिमित्त कुंभारवाड्यात २५० वर्षापासूनची परंपरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ मार्च-**

कासेगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथील कुंभारवाड्यात जगद्गुरू श्रीसंत तुकाराम बीजेनिमित्त हजारो भाविकांनी भाकरी आमटीच्या प्रसादाचा लाभ घेतला. गेल्या २५० वर्षापासून हि परंपरा येथे सुरू आहे.

येथील ब्रह्मसाक्षात्कारी सत्पुरूष वै. हभप तात्यामहाराज कासेगावकर यांनी २५० वर्षापूर्वी कुंभारवाड्यात श्रीसंत तुकाराम बीज उत्सव सुरू केला. या उत्सवानिमित्त सायंकाळी सर्व भाविकांना भाकरी आमटीचा प्रसाद दिला जातो. हा प्रसाद तयार करण्यासाठी गावातील प्रत्येक जण कुंभारवाड्यात शिधा आणून देतात. त्यामध्ये भाकरीचे पीठ, दाळ व अन्य साहित्य दिले जाते. जमा झालेले भाकरीचे पीठ भाकरी करण्यासाठी पुन्हा घरोघरी वाटले जाते. त्यातून महिला आपापल्या घरी भाकरी तयार करतात. त्या भाकरी कार्यकर्त्यांद्वारे गोळा करून कुंभारवाड्यात ठेवल्या जातात. येथे जमा झालेल्या दाळ व अन्य साहित्याद्वारे रसरशीत आमटी तयार केली जाते. मग सायंकाळी सहा ते नऊ वाजेपर्यंत गावातील प्रत्येक घरातून भाविकभक्त आमटी भाकरीचा आस्वाद घेण्यासाठी कुंभारवाड्यात जमा होतात. यंदाही सुमारे तीन हजार भाकरी तयार करण्यात आल्या होत्या. गावातील हजारो भाविकांनी त्याचा लाभ घेतला. दरम्यान बीजोत्सवानिमित्त येथे सकाळी दहा ते बारा हभप श्याम महाराज जोशी यांचे गुलालाचे कीर्तन झाले. यावेळी सरपंच यशपाल वाडकर, उपसरपंच शहाजहान शेख यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. कीर्तनानंतरची पंगत माजी चेअरमन तुकाराम जाधव-कारभारी यांनी दिली. रात्री नऊ ते अकरा हभप रमेशबुवा शिवापूरकर यांचे काल्याचे कीर्तन होऊन एकदिवसीय उत्सवाची सांगता झाली. हभप हणमंत काळे, हभप सागर सुतार, मृदंगाचार्य लक्ष्मण वाडकर, दत्ता वाडकर, अंकुश म्हेत्रे, ज्ञानेश्वर चव्हाण, रामहरी चौगुले, सुधाकर शिंदे, शिवाजी खारे, अर्जून हुडकर, बबन कुंभार, धनंजय कुंभार, श्रीराम कुंभार, नितीन वाडकर, सुभाष कुंभार, गुरूलिंग कुंभार यांचे सहकार्य लाभले. यावेळी साक्षी कुंभार हिने काढलेली रांगोळी लक्षवेधी ठरली.

